श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता. पाथर्डी यांचे गैरवर्तनाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ 2296330 /२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ-१.या कार्यालयाचे ज्ञापन दोषारोप क्र.ग्रापं-३/२१८१००९/२०२६,दि.१९/०२/२०२६.

२. गटविकास अधिकारी पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१६८/२६, दिनांक ०९/०३/२०२३ नुसार श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी,ग्रापं-अकोले, ता.पाथर्डी दि.०५/०३/२०२६ ची ज्ञापन पोहोच.

३.गटविकास अधिकारी पंचायत समिती जामखेड पत्र क्र.आस्था-२/२००/२०२६, दिनांक १८/०३/२०२६.

४. श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता.पाथर्डी यांचा खुलासा दिनांक १५/०३/२०२६ (प्राप्त दिनांक २३/०३/२०२६)

५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम (६)(३)

ज्याअर्थी, श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता.पाथर्डी येथे कार्यरत असताना गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.०२ अन्वये एकुण ०५ दोषारोप ठेवण्यात आले होते. संदभ क्र.४ अन्वये श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता.पाथर्डी यांनी दोषारोपांचा खुलासा विलंबाने सादर केला असुन दोषारोपातील सर्व आरोप अमान्य केले आहे.

सबब, श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता.पाथर्डी यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदीनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता.पाथर्डी यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक

विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने श्री लक्ष्मण दशरथ नांगरे, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती पाथर्डी यांची नियुक्ती करीत आहे .

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे व होणा-या प्रत्येक सुनावणीस नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202604100600061 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 10-04-2026 13:02:04
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अकोले ता.पाथर्डी यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे .तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री लक्ष्मण दशरथ नांगरे, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती पाथर्डी.

व्दारा व प्रत:-गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड.

२/- सोबतचा आदेश श्री.बाळासाहेब कारभारी तिडके, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर